# अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यातील वास्तववाद

**श्री. ज्ञानदेव नारायण ननुरे**
येलूर ता कंधार जि नांदेड

---

पारंपरिक धार्मिक मूल्यांना छेद देणारे ऐतिहासिक विधान नोंदवून जगाकडे डोळसवास्तववादी दृष्टिकोनातून बघण्याची शिकवण देणारेभारतीय समाज वर्ण व्यवस्थेच्या ह्या जोखड बंदात बंदिस्त असणाऱ्या.समाज व्यवस्थेने छळलेल्या,पिळलेल्या लोंकाना सन्मानाने अभिजात वास्तव साहित्यातून उभा करण्याचे महत्वपूर्ण कार्य साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे यांनी केलेल आपल्याला दिसूण येते. या पार्श्वभूमीवर अण्णा भाऊंचे क्रांतीकारकत्व व स्वांतत्र्य,समता,बंधुता,न्याय ही वास्तविक जीवनातील मूल्य यांचा समतोल म्हणजे अण्णा भाउंचा साहित्य. ह्या मुल्यांची विषमता उच्चावार्नियाकडून वाढणारी दरी हे पहाता अण्णा भाऊंचे वास्तववादी साहित्य विषमतेवर विश्वास ठेवणाऱ्या पेक्षा समतेची निकड भासणाऱ्या दलित व श्रमिक वर्गाला भाकरीच्या चंद्रासाठी संघर्ष करतानाही आपली मूल्यव्यवस्था जपावी व वाढवावी लागते.यांचे वास्तववादी दर्शन आम्हास अण्णा भाऊंच्या साहित्यातून होत. त्या संदर्भात अण्णा भाऊ आपल्या वैजयंता' कादंबरीच्या प्रस्तावनेत ' म्हणतात'जो कलावंत जनतेची कदर करतो त्याचीच कदर जनता करतेहे मी प्रथम शिकून नंतर लेखन करीत असतो.माझा माझ्या देशावर, जनतेवर नि तिच्या संघर्षांवर अढळ विश्वास आहे ' अण्णा भाऊंचे वेगळेपण म्हणजे त्यांनी कुठलेही औपचारिक शालेय शिक्षण घेतले नव्हते ,त्याबाबत ते एका ठिकाणी म्हणतात'जे मी स्वतजगलो आहे, पाहिलं आहे आणि अनुभवलं : आहे, तेच मी शब्दात मांडण्याचा प्रयत्न केला आहेमाझ्या साहित्यातील बऱ्याच व्यक्तिरेखा मला . .प्रत्यक्ष भेटलेल्या आहेत' यावरुन अण्णा भाऊंच्या वास्तववादी साहित्याची प्रचीती येते.

*अण्णा भाऊंचे साहित्य म्हणजे*

*वास्तवाचे फडफडणारे निशाण !*
*वारणेच्या खोऱ्यातील सरंजामशाही विरुद्ध*
*बंड करणाऱ्या हिंदुरावाचां सन्मान !*
*मानवमुक्तीचा भान ठेवणाऱ्या*
*भुकेल्यांचा अन्नदाता वीर तो फकिरांचा मान !*
*पुरुषप्रधान संस्कृतीतील स्वतःच शील जपणाऱ्या*
*सौंदर्यवान चित्राच्या सहाशी स्त्री जातीचा अभिमान !*
*लहानपणापासून तमासगिरी प्रवृत्तीचे चटके सहन करणाऱ्या*

*पण विषयवासनायुक्त नजरेच्या चक्रव्यूहात न सापडणारी*
*लढवायी वैजंता जणू संस्काराची खान !*
*दयारामच्या अन्यायाविरुद्ध पेटून उठणारी चंदन*
*घरातील कर्त्या पुरुषांच्या हेकेखोरी विरुद्ध बंड करणारी आवडी*
*गुलाम कादंबरीतील मीनाक्षी वेटबिगारी सदुचा वाढवी सन्मान !*
*वैर,आवडी,पाझर,चंदन,माकाडीचामाळ,चीखलातील कमळ*
*इनामदार,पेंग्याची लगीन,सुलताना,अकलेची गोष्ट,*
*देशभक्त घोटाळे यातील पात्र घडवी वास्तविकतेचे दर्शन !*

परीकाल्पेनीचे झालर लावून आपल्या साहित्याचा बाजार भरवानारे अनेक साहित्यिक आपण पहातोत.वास्तविकातेचा आव आणणारे साहित्यिक ही आपण पहातोत वाचातोत.ज्याच्या लिखाणाची भाषा व पात्र हे फक्त स्वप्न रंगवणारी असतात.पण अण्णा भाऊंच्या साहित्यातील प्रत्येक पात्र हे अन्याया विरुद्ध पेटून उठणारे वास्तववादी जगातील वास्तववादी चित्रण घडवणारे पात्र आपणास पहावयास मिळतात. अण्णा भाऊंनी जे वास्तविक जीवनात जे अनुभवले जे पाहिले तेच लेखणीच्या धारदार तलावारीने अन्यायाविरुद्ध, गुलामीविरुद्ध, मनुवादी, विचारसारनिविरुद्ध, कामगारांच्या शोषणाविरुद्ध सपासप वर केले.

**गुलामाल गुलामीची जान्हीव करून द्या,म्हणजे तो बंडकरून उठेल** विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे विचार अण्णा भाऊंच्या साहित्यांनी जागवले.कारण अण्णा भाऊंच्या साहित्यातील नट,नटी अन्यायाविरुद्ध व गुलामाविरुद्ध बंड करणाऱ्या व चारित्र्य जपणाऱ्या चारित्र्यवान आणि वास्तववादी होत्या.साहित्यातील प्रत्येक पात्र गुलामीच्या जान्हीवेने बंड करणारे बंडखोर पण उन्माद माजवणारे मुळीच नव्हते कारण त्यांची नाळ वास्तविक जीवनाशी जोडलेली होती.कोणी भूक भागवताना भाकरीसाठी बंड करणारी,तर कोणी चारित्र्य जपण्यासाठी बंड करणारी तर कोणी देशसेवेचे बिरूद हाती घेऊन स्वातंत्र्यासाठी बंड करणारी.हीच बाबासाहेबांना अभिप्रीत असणारी गुलामाविरुद्ध बंड करणारी बंडखोर पण वास्तववादी माणसे ही अण्णा भाऊंच्या साहित्यचा गाभा आहेत.

अण्णा भाऊंचे साहित्य म्हणजे आर्थिक कुचंबना,सामाजिक अप्रतिष्ठा,उचवार्नियाकडून होणारा अन्याय यातून माणूसपण जपानाऱ्या व्यक्तिरेखा सामान्य माणसांच्या जगण्याला बळ देणार वास्तववादी साहित्य,अण्णा भाऊंचा साहित्य म्हणजे जगण्याची उमेद, अण्णा भाऊंचा साहित्य म्हणजे वास्ताविकतेचा धगधगता निखारा, अण्णा भाऊंचा साहित्य म्हणजे मनुवादी विचारसारानीला चपराक, अण्णा भाऊंचा साहित्य म्हणजे चारित्र्याची खान, अण्णा भाऊंचा साहित्य

म्हणजे बंडाच फडफडणार निशाण, अण्णा भाऊंचा साहित्य म्हणजे छत्रपती शिवराय,लहूजी साळवे,महात्मा फुले राजर्षी शाहू महाराज,डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार.

अण्णा भाऊंच्या लेखणीत वर्गघसंर्षाची जाणीव सखोल पद्धतीने मांडलेली दिसून येते.दलित, शोषित व पिडीत समाजाच्या तळागाळातील माणूस हा त्यांच्या साहित्याचा आत्मा आहे. नाटक, कथा-कादंबऱ्यातील नायक-नायिका अन्यायाच्या बेड्या तोडणाऱ्या बंडखोर व लढवय्या वृत्तेचे पण वास्तववादी घटनेवर आधारित आहेत. अण्णा भाउंचा मार्क्सवाद तत्वज्ञान प्रिय आहे.सोबतच डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारातील विद्रोह त्यांना लढण्याचे नेहमीच बळ देत असे.**जग बदल घालून घाव सांगून गेले मज भीमराव** देशातील धनदांडग्यांनी व धर्मदांडग्यांनी सामान्यांचे जे शोषण केले.त्या शोषकांवर व त्यांच्या व्यवस्थेवर अण्णा भाऊंची लेखणी आघात करताना कधी कमी पडली नाही.हा डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा विचार त्यांनी वास्तविक साहित्यातून सर्वासमोर मांडला. गावकुसाबाहेरील अस्पृश्यता त्यांनी स्वतः भोगल्यामुळे जातीव्यास्थेचे वास्तविक दर्शन त्यांच्या साहित्यातून जागोजागी प्रगट होताना दिसून येते.

गाव पातळीवरील आत्मसन्मान व संघर्षाची कहाणी म्हणजे अण्णा भाऊंची **'फकीरा'** कांदबरी.यातील नायक फकीरा रंगवताना अण्णा भाऊनी कुठेही कल्पनेचा आव आणला नाही. लहानपणी फकीरांनी त्यांना व त्यांच्या कुटुंबाना केलेली मदत.आई कडून फकीरा बद्दल जे ऐकले त्यांची जिवंत मूर्ती अण्णा भाऊनी फकीरा कांदबरीत साकारली. कांदबरीचा नायक इंग्रजांची दुष्काळ,साथीचे व उपासमारीने तडफडणाऱ्या माणसाना जागविण्यासाठी धान्यांची गोदामे व इंग्रजांचे खजिने लुटून गोरागारीबाना धान्य व पैसा वाटतो.ही त्यांची नेतृत्व भूमिका साकारताना अण्णा भाऊनी वास्तववादी फकीरा तंतोतंत साकारला.त्या लोकांसाठी फकीरा जणू देवदुतच वाटत असे. अंगात बाराहत्तीच बळ असणारा फकीरा गावाच्या समृद्धीसाठी सामाजिक व सांस्कृतिक पातळीवर संघर्षाची धागेदोरे गुंफताना अण्णा भाऊनी किंचितही कल्पनेची साया फाकीरावाराती पडू दिला नाही. वास्तविक व हुभेहुभ फकीरा साकारताना अण्णा भाऊ जणू फकिरांच्या जागी राहून लेखन करीत असावेत असा भास आपणास यातून होताना दिसून येतो.मानावामुक्तीचे भान ठेवणारा,सर्वांना सोबत घेऊन आत्मसन्मानाने,पराक्रमाने व स्वाभिमानाने लढणारा शूर सेनापती 'फकीरा' आजच्या तरुणासमोरा आदर्श निर्माण करतो यात किंचितही शंका नाही.या कांदबरीतील एक प्रसंग. बेडसावगावाचा खजिना लुटताना आई आपल्या मुलींची अब्रू वाचवण्यासाठी फकीरापुढे याचना करते.त्यावेळी फकीराना त्या आईला दिलेले उत्तरफकिराच्याअंगी असलेल्या मानवी मुल्यांची साक्ष देते. नाही माय,नाही मी तुमची अब्रू लुटायला आलू नाही.मी खजिना लुटणारा हाय.अब्रू खाऊन उपाशी माणसे जगात नसत्यात.जावा आपल्या घरात बसा. यातून फकिरांच्या नैतिक व मानावीमुल्यांचे

दर्शन घडवताना अण्णा भाऊंची लेखणी कधी कल्पनेच्या तीरावर पोहचली नाही न कधी वास्तवाची जागा सोडली नाही.

वारणा खोऱ्यात 'प्रतिसरकार'स्थापन करणाऱ्या लढवय्या हिंदुरावांची कहाणी म्हणजे **'वारणेच्या खोऱ्यात'** या कांदबरीतील धाडसी व सहासी वारणेच्या खोऱ्यातील मुळचा शेतकरी असणारा हिंदुराव साकारताना हिंदुरावांची वास्तववादी व हुबेहूब छबी अण्णा भाऊनी या कांदबरीत साकारली.हिंदुरावाकडे असणारी जीवनदृष्टीसाकारताना अण्णा भाऊंची लेखणी किंचितही मागे सरली नाही. या कांदबरीतील पात्रे देशप्रेमी,त्यागी व शूरवीर आहेत.क्रांतिकारक हिंदुरावानी तरुणांची चळवळ उभारून येथील सरंजामशाहीवृत्ती विरुद्ध बंड पुकारले.अन्यायाविरुद्ध लढणारा हा तरुण व शोषित लोकाना हक्क प्राप्त करून देणारा नायक रेखाटताना अण्णा भाऊनी यातील वास्तववाद कधाही सोडला नाही.हे आपणास प्रकर्षाने जाणवते.

भटक्या विमुक्त जीवनाचे चित्रण करणारी वास्तवदर्शी कांदबरी म्हणून '**माकडीचा माळ'** या कांदबरीकडे पाहिले जाते.या कांदबरीतील पात्र यंकू माकडवाला त्याची तरुण मुलगी दुर्गा व दुर्गावर जीवापाड प्रेम करणारा यमू.सोबतच गंग्या व रंगी या माकडांची जोडी प्राण्यातील प्रामाणिकवृत्ती रेखाटताना अण्णा भाऊ माणसातून ही वृत्ती हरवल्याची वास्तववादी भावना रेखाटताना मात्र कमी पडले नाहीत.ही कांदबरी म्हणजे पोटाची खळगी भरण्यासाठी रानोमान फिरणाऱ्या यंकू माकडवाला व दुर्गा यांची वास्तवदर्शी कहाणी आपणा सर्वाना खूप काही शिकून जाते. गावोगावी फिरत असताना दुर्गा सोबत घडलेला प्रसंग.त्या प्रसंगाचा दुर्गानी केलेले सामना,यमूनी निस्वार्थपणे त्यांना केली मदत व यमूचे दुर्गावरील निस्वार्थ,निरागस प्रेम.या सर्व गोष्टी वाचकांच्या मनात घर करून रहातात.क्षणिक सुखासाठी गरिबांचे आयुष्य उद्धवस्त करणाऱ्या दुष्ट प्रवृत्तीचे चित्रण अण्णा भाऊंच्या लेखणीने हुबेहूब रेखाटलेले आपणास पहावयास मिळते.

आजच्या या पुरुष प्रधान संस्कृतीत स्त्रीयांनवर होणारा अत्याचार व त्याचा निडराने केलेला प्रतिकार.याच वास्तववादी दर्शन घडवणाऱ्या त्यांनी लिहिलेल्या अनेक स्त्रीप्रधान कांदबऱ्या कथा वाचावयास मिळतात.त्यातील एक प्रसिद्ध कांदबरी म्हणजे **'चित्रा'**.अण्णा भाऊ साताऱ्या जिल्ह्यात फिरत असताना कऱ्हाड-कोल्हापूर रस्त्याकिनारी एक भाची व तिचा मामा या दोघांना मधील प्रत्यक्ष झालेला संवाद त्यांनी या कांदबरीत वास्तवदर्शीपणे रेखाटला आहे.वास्तव व प्रामाणिक चित्रण हे या कांदबरीचे खास वैशिष्ट्य आहे.चित्रा सुंदर,चारित्र्यवान व शील जपणाऱ्या मुलीची सत्यकथा आहे.अगदी लहानपनापासून आठराविश्वदारीद्र्य वाट्याला.लहानपणीच वडिलाचे छत्र हरवलेली ही मुलगी,आई सखुबाई तिचासांभाळ करताना स्वतःचे शील जाण्याचा नेहमीच सल्ला देत असते.गरिबी व कर्ता पुरुष घरात नसेल तर त्या कुटुंबाच्या वाट्यालाअलेल्या दु;खाचेवास्तववादी

दर्शन अण्णा भाऊनी अगदी सुरेखपणे या कांदबरीत मांडलेले आपणास पहावयास मिळते.मामानी तिला कामासाठीम्हणून मुबईला नेऊन विकले असता.चित्रांनी स्वताचे शील सांभाळण्यासाठी केलेला प्रतिकाराचे जिवंत चित्रण अण्णा भाऊंच्या लेखणीने अचूकपणे टिपले आहे.

लहानपणापासून आईच्या पायातील घुंगराच्या आवाज एकूण मोठी झालेली व तामासाच्या फडात वाढलेल्या वैजंता तिची वास्तववादी दर्शन घडवणारी कांबरी म्हणजे **'वैजंता'** ही कांबरी म्हणजे तामासगिरांच्या व्यथा मांडणारी वास्तववादी कांदबरी म्हणून या कांदबरीकडे पाहिले जाते.चंद्रा नर्तकीने वैजांताच्या आई गजराबाईचा केलेल्या अपमानाचा बदला घेण्यासाठी.तिची आई गजराबाई वैजंताला एका दिवस तमाशाच्या फडात नाचायला उभी करते.येथूनच वैजंताच्या आयुष्यात संकटाचे वादळ उभा राहते. तिच्या सौंदर्यावर दिवाने असणारी पिसाट लोकंतिच्या मागे भुंग्यासारखी लागतात.यातून स्वतःची सुटका करून घेण्यासाठी तिने केलेली तारेवरची कसरत.उमा व तिचे निस्वार्थ प्रेम आपणास वास्तववादी निस्वार्थाप्रेमाची साक्ष देते.

अण्णाभाऊंचा जन्म ग्रामीण भागात झाल्यामुळे ग्रामीण भागातील सामजिक विषमता,गरिबी व उपासमारी त्यांनी अगदी जवळून अनुभवली होती.म्हणून त्यांच्या लेखनात ग्रामीण भागातील वास्तववादी दर्शन आपणास त्यांच्या साहित्यातूनदिसूनयेतं. ग्रामीण भागाचे वास्तवदर्शी वर्णन करणारी कांदबरी म्हणजे **'वैर'** गावागावीतील माणसा-माणसातील वैर,मत्सर,भांडणे यामुळे त्यांची न झालेली प्रगती.येळापूर गावचा इमानदार व गोपाळराव हा सरंजामशाही दुष्ट प्रवृत्तीचा असल्या कारणाने सामान्य शेतकरी कष्टकरी सामान्य जनतेला नाहक त्रास द्यायचा.त्याचा प्रतिकार करण्यासाठी वीर नायक त्याच गावातील प्रतिष्ठित शेतकरी मुकिंदा याने गोपाळरावाल शह देण्यासाठी उभारलेले बंड.अण्णा भाऊनी या कांदबरीत अगदी तंतोतंत रेखाटले आहे.यातून अण्णा भाऊंच्या लिखाणातील वास्तववादीचे सुंदर दर्शन आपणास घडते.पुढे इनामादाराच्या सांगण्यावरून गावात लावलेली आग,मुकुंदाच्या सुनेला नरश्या दरोडेखोर गोपाळरावाच्या सांगण्यावरून पळवून नेण्याचा प्रसंग.याचा मुकिंदानी घेतलेला बदला.गुन्हेगारी प्रवृतीच्या लोंकाचा शेवट ही वाईटच होतो.अण्णा भाऊ स्वतः गरीबीचे चटके सहन केल्यामुळे गरिबी-श्रीमंतीची दरी या कांदबरीत वास्तविकरीत्या सुरेखपणे मांडलेली दिसून येते.

वासूची गुलामगिरीतून झालेली सुटका अण्णा भाऊनी **'गुलाम'** या कांदबरीतून वास्तववादी कहाणी सर्वासमोर मांडली.समतावादी विचारांच्या अण्णा भाऊनी विषमतेला छेद देऊन समता प्रस्थापित करण्याचा उद्देशाने गुलाम ही वास्तववादी कांदबरी जन्मास घातली.गरीब किंवा सामान्यांची पोरं श्रीमतांच्या प्रेमात पडतात पण ते प्रेम अमान्य असते.सदू या वेठबिगाराचा मुलगा,वासू हा आपल्या वडिलांच्या मृत्युनंतर जमीनदार रावसाहेबांकडे काम करतो.तेंव्हा

जमीनदाराची मुलगी मीनाक्षी वासूच्या प्रेमात पडते.परंतु मधु नावाच्या मुलीशी वासूचे लग्न लावून त्याची गुलामगिरीतून केलेल्या सुटकेचे वास्तावावादी चित्रण अण्णा भाऊनी या कांदाबरीतून घडवलेले आपणास दिसून येते.

'**चंदन'** ही विधवा स्त्रीची कहाणी असणारी वास्तावादी कांदबरी.चंदन ही कामानिमित्त मुंबईला आलेली स्त्री.दुर्दैवाने तिच्या पतीच्या अपघाती निधनानंतर तिच्यावर ओढवलेलं विधवापनाच दु:ख व एका विधवा स्त्रीने आपली अब्रू सावरत सूडबुद्धीने वागणाऱ्या लोकांशी जी झुंज दिली ती दु:खादायक,संघर्षमय व वास्तवदर्शी कहाणी अण्णा भाऊनी यात रेखाटली आहे. पतीच्या निधानांतरही समर्थपणे स्वताच्या पायारावर उभा रहाणारी चंदन ही शिक्षणाचे महत्त्व ओळखून मुलांना शाळेत पाठवणारी शिक्षणाविषयी जागरूक असणारी आपणास पहावयास मिळते.दयाराम सारख्या निच्चप्रवृत्तीच्या माणसाकडून होणाऱ्या शोषणाचा तिने केलेला प्रतिकार याचे अगदी रोमहर्षक चित्रण यातून घडते.

कुटुंबातील कर्त्या पुरुषांच्या हेकेखोरी विरुद्धात बंड करून स्वतःच अस्तित्व निर्माण करू पहाणारी आवडीची सत्य कथा अण्णा भाऊनी '**आवडी'** या कांदबरीत मांडलेली आहे. आवडी म्हणजे घरच्या कर्त्या पुरुषांच्या हेकेखोरीमुळे बळी केलेल्या व प्रेमात जात धर्म,जात,वंशभेद,राहूच शकत नाही हाच विचार करून धानाजीसाराख्या खालच्या जातीतील मुलासोबत निस्वार्थ प्रेम करणाऱ्या आवडीची दर्दभरी कहाणी अण्णा भाऊनी अगदी सुरेख चित्रण यात केले आहे. स्वतःचं व्यक्तिमत्व जपणारी आवडी धनाजीच्या भेटीनंतर त्याच्या सारख मनसोक्त आयुष्य जगण्याचे ठरवते. घराण्याला कलंक लावला म्हणून होणाऱ्या कोणत्याही छळाला सामोरी जाणारी आवडी अण्णा भाऊनी अगदी वास्तवादी रेखाटली आहे.

रत्ना,रानगंगा,रूपा,मथुरा,चिखलातील कमळ,पाझर या आणखी काही कांदबऱ्या अण्णा भाऊंच्या वास्तववादी लिखाणाची साक्ष देतात.सोबत कथा,नाटके,पोवाडे व लावण्यातही वास्तवता दिसून येते. वास्तववादी लिखाण हाच अण्णा भाऊंच्या साहित्याचा आत्मा होय.

अण्णा भाऊंनी आपल्या अनेक कथांमधून वास्तविक लेखन करताना सामाजिकराजकीय, धार्मिक, - कौटुंबिक समस्यांना तोंड फोडले. स्वतंत्र बाण्याच्या बंडखोर नायिका व तळच्या जात-वर्गातील 'लढाऊ नायक त्यांनी निर्माण केले. त्यांच्या '**बंडवाला** या कथेत जमीनदाराच्या अन्यायाविरुद्ध लढणारा मांग समाजातील तरुण आहे'**रामोशी'** . या कथेत यदू रामोशी हा जमीनदाराच्या अन्यायाविरुद्ध आणि भ्रष्ट सरकारी यंत्रणेविरुद्ध कसा संघर्ष करतो याचे चित्रण अगदी वास्तविकपणे अण्णा भाऊनी रेखाटले आहे .'**कोंबडीचोर'**मध्ये स्वातंत्र्य मिळाल्यानंतरही दारिद्र्यउपासमार , शिल्लक राहिल्याने गरिबीमुळे सामान्य माणूस कसा चोरी करण्यास मजबूर होतो याचे चित्रण

वास्तविकतेचे चित्रण घडवते .**'बरबाद्या कंजारी'** या कथेत मुंबईच्या झोपडपट्टीतील भटक्या समाजाची दयनीय अवस्था व जात पंचायतीच्या अमानुष प्रथांचे दर्शन घडतेया जात पंचायतीला . आव्हान देऊन बरबाद्या व त्याची मुलगी कशी बंडखोरी करते याचे खरे खुरे वर्णन या कथेतून आपणास वाचावयास मिळते'अण्णा भाऊंच्या **'गजाआड** . या कथासंग्रहातील अनेक कथा त्यांना जे तुरुंगात कैदी भेटले त्यांच्यातील संवेदनशील माणसांवरील मजबुरीचे वास्तवादी दर्शन घडवितात . **'जिवंत काडतूस'** या कथेत ते १९४२ च्या भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील त्यांच्या मित्राच्या कर्तृत्वावर प्रकाश टाकतात अण्णा भाऊंनी त्यांच्या आयुष्यातील काही .वर्षे मुंबईच्या घाटकोपरमधील चिरागनगर या झोपडपट्टीत घालविलीतेथील गरीब, व्यसनी, व्यभिचारी, चोऱ्यामाऱ्या करणाऱ्या, . गुंड, मवाली, उपेक्षित, भटक्या माणसांचे जगणे, त्यांचा जीवनसंघर्ष अण्णा भाऊंच्या **'चिरागनगरची 'भुतं** या संग्रहातील कथांत आढळतो**'मरीआईचा गाडा'** . या कथेत अंधश्रद्धेला आव्हान देण्याचे काम या कथेतील नाना नावाचे पात्र करतेडॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वाखालील . चळवळीमुळे दलित-अस्पृश्य समाजात जे नवे आत्मभान आले त्याचेही चित्रण अण्णा भाऊंच्या **'वळण', 'सापळा'** या कथांमध्ये आढळतेदलितांनी मेलेल्या गुरांची विल्हेवाट लावणे, त्याचे मांस . खाणे थांबवावे असा संदेश डॉ. बाबासाहेबांनी दिला होता. त्या संदेशामुळे महाराष्ट्रातील अनेक गावांत तणावपूर्ण स्थिती निर्माण झालीहोतीअनेक गावांत दलितांना बहिष्काराला तोंड द्यावे , लागले होते. अनेक दलितांना मृत मांस खाण्याच्या जुन्या सवयी सोडणेही जड जात होते. या 'द्वंद्वाचे चित्रणही अण्णा भाऊंच्या 'वळण, सापळा'सारख्या कथांत आढळते. भारतीय समाजातील ' जातीय उतरंडीमुळे चांभार-मांग समाजातही कशी श्रेष्ठकनिष्ठ भावना वाढीस लागते याचे चित्रण - **''उपकाराची फेड** या कथेत पाहायला मिळते.या सर्व कथेतील हे वास्तववादी चित्रण अण्णा भाऊनी साहित्याच्या स्वरूपात आपणासमोर मांडलेल आहे.

दलित,शोषित,कामगारांचे वर्णन अण्णा भाऊनी आपल्या साहित्यात वास्तविकपणे मांडलेले आपणास जागोजागी पहावयास मिळते. अण्णा भाऊ स्वतः गिरणीकामगार असल्या कारणाने.कामगारांच्या व्यथा अगदी जवळून पाहिल्या आहेत त्या आपल्या साहित्यात मांडताना वास्तवापासून कधी दूर गेले नाहीत.अण्णाभाऊंना मराठी माणसाच्या गाथा गाण्यात धन्यता वाटत होती .'महाराष्ट्राची परंपराहा त्यांचा प्रदीर्घ पोवाडा महाराष्ट्राच्या शौर्याचा इतिहास आहे.अण्णाभाऊंनी अनेक पोवाडे ' लिहिले व गायिले. त्यांची शाहिरी ही त्यांच्या हातातली तळपती तलवार होती. कामगार चळवळीत .त्यांचे व्यक्तिमत्त्व ढाळले गेले होते. ते साम्यवादी होते'जगातल्या कामगारांनोएक व्हा' ही कार्ल , मार्क्सची हाक त्यांच्याही कानावर पडली होती. कामगारांच्या चळवळीत वारकऱ्यांच्या श्रद्धेने त्यांनी भाग घेतला होता. मुंबईतील गिरणी कामगारांचा क्रांतिकारी श्वासोच्छवास त्यांना स्पर्श करत होता.

‘ कामगारांचा श्वास आपल्या छातीत कोंडून त्यांनी**स्टालिनग्राडचा पोवाडा’** लिहिला व गायला . वर्गसंघर्षात त्यांनी स्वत:ला झोकून दिले होते. कामगार हा उद्याच्या इतिहासाचा नायक ठरणार, यावर त्यांचा ठाम विश्वास होता. भांडवलशाही नष्ट होऊन जगात कामगारांचे राज्य स्थापन होईल, .ही आशा बाळगून ते आपली लेखणी चालवत होते‘दलितांचा आशाकिरण म्हणून ते ’ स्टालिनग्राडकडे पाहत होतेहा पोवाडाही बराच मोठा आहे. रशियन क्रांतीने जगातील कामगारांचे . स्वप्न फुलवले होते. अण्णाभाऊंना रशियाला जाण्याची संधी प्राप्त झाली तेव्हा त्यांना खूप आनंद झाला. त्यांना खूप धन्यता वाटली.कामगारांच्या हक्का‍ंसाठी लढणारा प्रत्येक नेता हा अण्णाभाऊंच्या शाहिरीचा जणू नायक होताखानदेशातल्या श्रीपत पाटलांच्या नेतृत्वाखाली . निघालेल्या कामगारांच्या मोर्चात नऊ कामगारांनी प्राण गमावले. श्रीपत पाटलांनी हौतात्म्य ’पत्करले. त्यांच्यावर अण्णाभाऊंनी **‘अमळनेरचे अमर हुतात्मे** हा पोवाडा लिहिलाआणि त्यात ; प्राण फुंकून त्यांनी तो गायला. श्रीपत पाटलांना त्यांनी अमरपद दिले.यातून अण्णा भाऊंच्या वास्तववादी लेखनिची शक्ती लक्षात येते.

सयुंक्त महाराष्ट्राच्या चळवळीतील ‘माझी मैना गावाकडे राहिली माझ्या जीवाची होतीया कायली’ ही छक्कड असेल व्वा अनेक त्यांची गीते व नाटके ज्यात इमानदार,पेंग्याचं लगीन,सुलताना ही नाटके व आकालेची गोष्ट,देशभक्त घोटाळे,शेटजींच इलेक्शन,बेकायदेशीर,पुढारी मिळाला,लोकमंत्र्याचा दौरा,माझी मुंबई,कापऱ्या चोर,मूक मिरवणूक इत्यादी लोकनाट्यातूनही अण्णा भाऊनी वास्तविक लेखन केलेलं आपणास पहावयास मिळत.

अण्णा भाऊंनी आपल्या पुरोगामीसमतावादी, वैज्ञानिक विचारांनी पारंपरिक, पौराणिक तमाशाच्या - गण-गवळण ढाच्यातहीआमूलाग्र परिवर्तन केले. तमाशाच्या प्रारंभी होणाऱ्या गणेश वंदनालाही त्यांनी फाटा दिला आणि प्रथम वंदू भूचरणा व छत्रपती शिवाजी राज‍ासारख्या शूर पुरुषाला वंदन केलेथोडक्यात त्यांनी देवाऐवजी माणसाला वंदन करण्याची नवी प्रथा पाडली. तमाशात . गवळणींची जी अश्लील भाषेत टिंगल-टवाळी चालायची तिलाही त्यांनी काट दिला. अण्णा भाऊंनी महात्मा फुल्यांच्या सत्यशोधकी जलसा व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या चळवळीतील आंबेडकरी जलसाची जनप्रबोधनाची क्रांतिकारी परंपरा नव्या लोकनाटय़ातून पुढे नेलीत्यांनी मराठी व . भारतीय साहित्य-संस्कृतीच्या उच्चभ्रू पांढरपेशी कक्षा रुंदावल्या. त्यामुळे अण्णा भाऊंचे साहित्य ,इंग्रजीहिंदीरशियन,फ्रेंच,झेक आदी जागतिक भाषांतही अनुवादित झाल,ेमराठीतील ज्येष्ठ . साहित्यक व दलित साहित्याचे प्रवर्तक बाबुराव बागूल यांनी अण्णा भाऊंची तुलना सुप्रसिद्ध रशियन साहित्यिक मॅक्झिम गॉर्की यांच्याशी केली आणि ‘महाराष्ट्राचा मॅक्झिम गॉर्की’ असा गौरव .केला

महाराष्ट्रातच नव्हे,देशातच नव्हे तर जगासमोर आपल्या वास्तववादी आदर्श लेखणीने व साहित्याने एक आदर्श निर्माण केलं.जे भोगलं,जे पाहिलं,जे अनुभलं,तेच आपल्या लेखणीतून जगासमोर मांडणाऱ्यासाहित्यरत्न अण्णा भाऊ साठे या महान साहित्यिकास माझा मानाचा मुजरा.